
# मी ‘हंसा मेहता’ बोलतेय!



मी हंसा मेहता. माझा जन्म ३ जुलै १८९७ रोजी गुजरातमध्ये झाला. आणि आयुष्यभर मी एकच गोष्ट मनात जपली – स्त्री ही ‘माणूस’ आहे, पुरुषाची सावली नाही.

लहानपणापासून मला एक गोष्ट खटकायची. आपण म्हणतो – “माणूस” पण त्याचा अर्थ घेतो “पुरुष”. मजुरीचा दर सांगताना “बाईचा” आणि “माणसाचा” असा फरक करतो. जणू बाई माणूसच नाही! हा विचार इतका खोलवर रुजलेला आहे की आपल्याला तो जाणवतही नाही. पण मला तो टोचत राहिला.

माझं बालपण पुरोगामी वातावरणात गेलं. माझे आजोबा समाजसुधारक होते. वडील बडोदा महाविद्यालयात प्राध्यापक आणि पुढे दिवाण झाले. सयाजीराव गायकवाडांसारख्या प्रगतिशील राजांच्या राज्यात मी शिकले. तरीही महाविद्यालयात आम्ही फक्त तीनच मुली होतो. बाकी सगळे मुलगे. वातावरणात उपहास, असूया, अवहेलना... पण मी ठरवलं होतं – आम्ही कमी नाही हे सिद्ध करायचंच.

शिक्षणानंतर मी लंडनला पत्रकारिता शिकायला गेले. तिथे माझी भेट झाली Sarojini Naidu यांच्याशी. त्या माझ्या गुरुच बनल्या. त्यांच्या सहवासात मी स्त्रियांच्या हक्कांच्या चळवळीत उतरले. युरोप-अमेरिकेतील स्त्रियांच्या मताधिकाराच्या लढ्यांनी माझा दृष्टिकोन अधिक स्पष्ट केला. मी भारतात परतले – स्वातंत्र्यलढ्यात उडी घ्यायचीच या निर्धाराने.

महात्मा गांधी यांच्या विचारांचा माझ्यावर प्रभाव होता, पण मी आंधळी भक्त नव्हते. त्यांचं प्रत्येक शब्द अंतिम सत्य आहे असं मला कधी वाटलं नाही. विचार स्वतः करायचा, मत स्वतः ठरवायचं – ही माझी भूमिका होती.

मी जीवराज मेहतांशी आंतरजातीय विवाह केला. समाजाने बहिष्काराची धमकी दिली. तेव्हा मी स्पष्ट सांगितलं – “मी जात मानतच नाही.” समाज बदलायचा असेल तर धाडस करावंच लागतं.

चळवळीत काम करताना तुरुंगवासही भोगला. पण माझा खरा लढा एका वेगळ्या आघाडीवर होता – भाषेतल्या आणि कायद्यातल्या भेदभावाविरुद्ध.

१९४७ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी अधिकार आयोगावर मी भारताचं प्रतिनिधित्व करत होते. मसुद्यात पहिलं वाक्य होतं – “All men are born free and equal.”

मी म्हणाले – “All men म्हणजे काय? फक्त पुरुष? मग स्त्रिया कुठे?”

मी ठामपणे सांगितलं – हा शब्द स्त्रियांचे हक्क नाकारण्यासाठी वापरला जाऊ शकतो. आणि अखेर “men” ऐवजी “human beings” हा शब्द स्वीकारला गेला.

आज जगभर जेव्हा म्हटलं जातं – “All human beings are born free and equal” – तेव्हा त्यात स्त्रीही समाविष्ट आहे. हा बदल माझ्यासाठी अभिमानाचा क्षण होता.

संविधानसभेतही मी समान नागरी संहितेचा आग्रह धरला. कायदे धर्माधारित नसून समान आणि प्रगतिशील असावेत, अशी माझी भूमिका होती. १४ ऑगस्ट १९४७ रोजी, स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला, मी महिलांच्या वतीने राष्ट्रध्वज संविधानसभेला अर्पण केला – तो क्षण माझ्या आयुष्यातील अत्यंत भावूक क्षण होता.

स्वातंत्र्यानंतर मी शिक्षण क्षेत्रात काम केलं. महाराजा सयाजीराव विद्यापीठाची कुलगुरू झाले. मुलं-मुली एकत्र शिकावीत, दोघांसाठी समान अभ्यासक्रम असावा – ही माझी ठाम भूमिका होती. पुढे देशाच्या शिक्षणधोरणातही ते स्वीकारलं गेलं.

१९५९ साली मला पद्मभूषण देऊन सन्मानित करण्यात आलं. पण माझ्यासाठी खरा सन्मान कोणता? जेव्हा एखादी मुलगी आत्मविश्वासाने म्हणते – “मी माणूस आहे. मला समान हक्क आहेत.” – तोच माझा खरा पुरस्कार.

माझं आयुष्य एका वाक्यात सांगायचं तर – स्त्रीला माणूस म्हणून मान्यता मिळावी, यासाठीचा अखंड संघर्ष. आणि मला खात्री आहे – जोपर्यंत प्रत्येक स्त्री स्वतःला पूर्ण मानव म्हणून उभी करत नाही, तोपर्यंत माझा आवाज थांबणार नाही.